بِسۡمِ اللّٰہِ الرَّحۡمٰنِ الرَّحِیۡمِ     نَحۡمَدُہٗ وَنُصَلِّیۡ عَلٰی رَسُوۡلِہِ الۡکَرِیۡمِ     وَعَلٰی عَبۡدِہِ الۡمَسِیۡحِ الۡمَوۡعُوۡدِ

لَآ اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ مُحَمَّدٌ رَّسُوۡلُ اللّٰہِ

دفتر مجلس انصاراللہ بھارت

Office Of The Majlis Ansarullah Bharat

Mohallah Ahmadiyya Qadian-143516, Distt.Gurdaspur (Punjab) INDIA



محلہ احمدیہ قادیان ۱۴۳۵۱۶ ضلع: گورداسپور (پنجاب)     Mob.9682536974, E-Mail :ansarullah@qadian.in


# हजरत अपेक्षित मसीह व महदी (अ.स.) यांच्या विवेकपूर्ण उपदेशांद्वारे पवित्र कुरआन ची प्रतिष्ठा, स्थान, दर्जा आणि महानता यांचे वर्णन

# जमाअतच्या सदस्यांना भरपूर प्रार्थना करण्याचे आवाहन

सारांश प्रवचन खुतबा हजरत मिर्जा मसरूर अहमद, मसीहाचे पंचम खलीफा (अल्लाह त्यांचा सहाय्यक असो) दिनांक १० मार्च २०२३, मशिद मुबारक, टिलफर्ड,

أَشْهَدُ أَنْ لَا إِلٰهَ إِلَّا اللّٰهُ وَحْدَهُ لَا شَرِيْكَ لَهُ وَأَشْهَدُ أَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهُ وَرَسُوْلُهُ أَمَّا بَعْدُ فَأَعُوْذُ بِاللّٰهِ مِنَ الشَّيْطٰنِ الرَّجِيْمِ۔
بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ۔ اَلْحَمْدُ لِلّٰهِ رَبِّ الْعٰلَمِيْنَ۔ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ۔ مٰلِكِ يَوْمِ الدِّيْنِ۔ إِيَّاكَ نَعْبُدُ وَإِيَّاكَ نَسْتَعِيْنُ۔ اِهْدِنَا الصِّرَاطَ الْمُسْتَقِيْمَ۔ صِرَاطَ الَّذِيْنَ أَنْعَمْتَ عَلَيْهِمْ غَيْرِ الْمَغْضُوْبِ عَلَيْهِمْ وَلَا الضَّآلِّيْنَ :

तशहहुद, तआवुज आणि सुरह फातिहाच्या पठनानंतर हुजूर अनवर म्हणाले कीः

आजकाल मी माझ्या प्रवचनात पवित्र कुरआनाचे गुण आणि वैशिष्टयांचा उल्लेख करत आहे. हजरत अपेक्षित मसीह व महदी (अ.स.) पवित्र कुरआनच्या गुणवत्तेचे आणि गुणांचे वर्णन करताना सांगतात की, मी स्पष्टपणे सांगतो की पवित्र कुरआन इतका परिपूर्ण आणि सर्वसमावेशक ग्रंथ आहे की इतर कोणतेही पुस्तक त्याच्याशी स्पर्धा करू शकत नाही. याचे उदाहरण प्रस्तूत करत ते म्हणतात की, वेद मध्ये एकही अशी श्रुती आहे जी कुरआनीय आयत هُدًى لِّلْمُتَّقِيْنَ (अर्थात सदाचारींसाठी मार्गदर्शनपर आहे) ला आव्हान देऊ शकते. जर केवळ मुखातून उच्चारणे उचित आहे, म्हणजे त्याच्या फळांची आणि परिणामांची गरज नाही, मग सर्व जग सर्वशक्तिमान ईश्वराला कोणत्या ना कोणत्या रूपाने कबूल आणि भक्ती, उपासना, अनुदान आणि त्यागार्पण यांना चांगल्या गोष्टी मानतात आणि कोणत्या ना कोणत्या प्रकारे त्यावर अंमलही करतात. हिंदूंना उत्तर देताना ते म्हणाले की, ''मग वेदांनी जगात येऊन काय केले?'' किंवा जे वेदांचे अनुयायी नाहीत त्या राष्ट्रांमध्ये सद्गुणांची कमतरता आहे हे सिद्ध करा.

अपेक्षित मसीह व महदी (अ.स.) म्हणतात की, जिथून पवित्र कुरआन सुरू केले तेथून त्याने प्रगतीचे वचन दिले आहे, जो सहज आत्म्याची मागणी आहे. म्हणून, सुरह-अल-फातिहामध्ये اِهْدِنَا الصِّرَاطَ الْمُسْتَقِيْمَ ची शिकवण दिली आणि सांगण्यात आले की तुम्ही प्रार्थना करा की हे अल्लाह आम्हाला सरळ मार्ग दाखव आणि मार्गदर्शन कर. मार्गदर्शनाची प्रार्थना

दिली तर वचनही दिले की मी सरळ मार्गावर मार्गस्थ करेन, अशा लोकांचे मार्ग ज्यांच्यावर पुरस्कार व सन्मानाचा वर्षाव झाला. या प्रार्थनेसोबतच सुरह अल-बकाराच्या पहिल्या आयतमध्ये शुभवार्ता देण्यात आली की, ذٰلِكَ الْكِتٰبُ لَا رَيْبَ فِيْهِ هُدًى لِّلْمُتَّقِيْنَ. सन्मार्गाची प्रार्थना शिकवली तर त्यास प्राप्त करण्यासाठी कार्यप्रणालीही प्रदान करण्यात आली ज्यावर अंमल केल्याने श्रद्धावंतांना सन्मार्ग प्राप्त होईल. जणू आत्मे प्रार्थना करतात आणि त्याच वेळी स्वीकृती त्याचा प्रभाव दर्शवते. आणि ते वचन पवित्र कुरआनाच्या प्रकटीकरणाच्या रूपाने पूर्ण होत आहे. हे सर्वशक्तिमान अल्लाहची कृपा आणि दया आहे, परंतु दुर्दैवाने जग त्याबद्दल अनभिज्ञ आणि दुर्लक्षित आहे आणि त्यापासून दूर राहून नाश पावत आहे.

पुढे अपेक्षित मसीह व महदी (अ.स.) सांगतात की, मी पुन्हा सांगतो की, ईश्वराने कुरआनमध्ये पुण्यवानांच्या गुणधर्मांना किरकोळ गुणधर्म म्हणून ठेवले आहे, परंतु जेव्हा एखादी व्यक्ती त्यावर विश्वास ठेवून स्वतःच्या मार्गदर्शनासाठी मूळाधार बनवते तेव्हा तो त्या अत्योच्च पातळीला ग्रहन करतो जो هُدًى لِّلْمُتَّقِيْنَ मध्ये अभिप्रेत आहे. मग ते म्हणाले की पवित्र कुरआनची शिकवण ही एक परिपूर्ण शिकवण आहे. काळाच्या गरजानुसार पवित्र पैगंबर (स.) यांचे अवतरण हा आणखीन एक पुरावा आहे आणि त्याचा परिणाम اَلْيَوْمَ اَكْمَلْتُ لَكُمْ मध्ये स्पष्ट करण्यात आले आहे. जणू त्याकाळाची परिस्थिती पवित्र पैगंबराच्या आगमनाचा पुरावा आहे. हे घटक प्रेषितत्वाची दुय्यम शाखा आहे. श्रेष्ठता ही नव्हती की अध्याय आणि आयती प्रकट झाल्या किंबहुना अंतःकरणाची बाह्य व आंतरिक परिपूर्णता आणि काळजाची शुद्धतेला पूर्ण करणे इच्छित होते. त्यांनी रानटी लोकांना माणूस,सचेतन, नैतिक आणि ईश्वरभीरु घडवले. त्याचप्रमाणे परमेश्वरीय ग्रंथाला परिपूर्ण केले; असे कोणतेही सत्य आणि धार्मिकता नाही जे पवित्र कुरआनमध्ये नाही.

अपेक्षित मसीह व महदी (अ.स.) म्हणतात की, बहुसंख्य मुस्लिमांमध्ये आणखी एक चूक आहे की ते पवित्र कुरआनपेक्षा हदीसला प्राधान्य देतात. पवित्र कुरआनला विश्वासित आणि प्रमाणित दर्जा प्राप्त आहे तर हदीस हे अनुमानित दर्जावर आरूढ आहे. हदीस न्यायाधीश नव्हे तर कुरआन न्यायाधीश आहे. निर्णय देण्याचा अधिकार पवित्र कुरआनला प्राप्त आहे तर हदीस पवित्र कुरआनचे स्पष्टीकरण करण्यासाठी आहे. जी हदीस पवित्र कुरआनाच्या शिकवणूकीच्या विरूद्ध जात नाही ती अनुकरण योग्य आहे. परंतु जर ती विरूद्ध असली तर ती हदीस नव्हे तर निरर्थक कथन आहे. परंतु पवित्र कुरआन समजण्यासाठी हदीस आवश्यक आहे. पवित्र प्रेषित (स.) यांनी पवित्र कुरआनमध्ये प्रकट झालेल्या दैवी आज्ञांना आपल्या कृतीद्वारे करून दाखवले आणि एक आदर्श स्थापित केले आणि इस्लामी शिकवण ग्रहन करण्यात व्यत्यय उद्भवले असते जर त्यांचे आदर्श आमच्यासमोर नसते. परंतु लक्षात असावे की, मूळग्रंथ पवित्र कुरआन आहे. काही उच्च सदाचारी थेट प्रेषित मुहम्मद (स.) यांच्याकडून अशा हदीस ऐकत असे जे इतरांना

माहीत नसे, किंवा ते काहीं महत्त्वपूर्ण हदीसांची पुष्टी करतात. हजरत अपेक्षित मसीह या संदर्भात सांगतात की मी सुद्धा काहीं हदीस थेट प्रेषिताकडून ऐकले आहे.

अपेक्षित मसीह व महदी (अ.स.) कुरआनच्या वक्तृत्वाबद्दल म्हणतात की कुरआनच्या मजकुरात इतकी वक्तृत्व, योग्यता, सौम्यता आणि तेज आहे की जर इस्लामचा सक्रिय टीकाकार आणि प्रखर विरोधक असेल आणि त्याला अरबी भाषा आणि व्याकरणात निपुण असेल आहे, एखाद्या राज्यकर्त्याच्या वतीने हा आदेश द्यावा की जर तुम्ही वीस वर्षांत पवित्र कुरआनच्या दोन किंवा चार ओळींच्या समतुल्य लेख तयार करू शकत नसाल तर तुम्हाला मृत्यूदंड दिले जाईल. तरी तो कधीही करू शकणार नाही जरी जगभरातील शेकडो विद्वान त्याचे सहाय्यक असेल. ही पवित्र कुरआनची परिपूर्णता आणि त्यातील वक्तृत्व आहे. हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) म्हणाले की, ही काल्पनिक आणि असत्य गोष्ट नाही तर पवित्र कुरआन अवतरित झाल्यापासून हे आव्हान जगासमोर आहे. हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) म्हणतात की वक्तृत्व आणि भाषाशैलीमध्ये पवित्र कुरआनशी स्पर्धा करणे अशक्य आहे.

परत पवित्र कुरआनच्या वक्तृत्वाचे वर्णन करताना, एक सभेत, ते म्हणाले: येथे जितके चिन्हे आणि आयत प्रकट होत आहेत, ते खरोखर अल्लाहच्या पैगंबराचे चमत्कार, करामत आणि हे ईशवाणी पवित्र कुरआनाचे भविष्यवाण्या आहेत. कारण हे सर्व पवित्र पैगंबर आणि पवित्र कुरआनचे अनुकरणाचे फळ आहे. आणि यावेळी कोणताही असा धर्म नाही ज्याचे अनुयायी असा दावा करू शकतात की तो भविष्यवाणी करू शकता किंवा त्याद्वारे अलौकिक घटना प्रकट होतात, म्हणून पवित्र कुरआनचा चमत्कार सर्व ग्रंथांच्या चमत्कारांपेक्षा मोठा आहे.

अपेक्षित मसीह व महदी (अ.स.) म्हणतात की जर तुम्ही पवित्र कुरआनच्या अगदी लहान अध्यायाकडे पाहिले तर तुम्हाला कळेल की वक्तृत्व आणि भाषाशैलीच्या पातळीव्यतिरिक्त, वैयक्तिक गुण आणि शिक्षणाची परिपूर्णता भरलेली आहे. सुरह इखलास पहा, त्यात एकेश्वरवादाचे सर्व स्तर आणि दर्जे स्पष्ट केले आहेत आणि सर्व प्रकारचे अनेकेश्वरवादाला नाकारले आहेत. त्याचप्रमाणे सुरह फातिहाला पहा, किती आश्चर्यकारक चमत्कारक तो सामावून आहे. ही एक छोटी सुरह आहे, ज्यामध्ये सात आयत आहेत, परंतु प्रत्यक्षात संपूर्ण कुरआन ची शैली, सारांश, आणि अनुक्रमणिका आहे. नंतर त्यामध्ये, सर्वशक्तिमान अल्लाहचे अस्तित्व, त्याचे गुणधर्म, प्रार्थनेची आवश्यकता आणि ती स्वीकारण्याची कारणे आणि माध्यमे, उपयुक्त आणि फायदेशीर प्रार्थना करण्याची पद्धत, हानिकारक मार्ग टाळण्यासाठी मार्गदर्शन उपलब्ध आहे. अनेक पुस्तके आणि धर्ममार्तडांना पहा की ते इतर धर्मांचे दोष आणि उणीव नमूद करतात आणि त्यांच्यावर टीका करतात. परंतु हे मुद्दे मांडताना, कोणीही धार्मिक व्यक्ति त्याविरुद्ध कोणतीही चांगली शिकवण मांडत नाहीत आणि सांगत नाही की जर मी तुम्हाला अशा वाईट गोष्टीपासून परावृत्त राहण्याचे उपदेश करत तर त्याऐवजी ही चांगली शिकवण अनुसरण करण्यास प्रदान करतो. हे गुण कोणत्याही धर्मात नाही. पवित्र कुरआनचा अभिमान आहे की तो इतर खोट्या धर्मांना नाकारतो

आणि त्यांच्या खोट्या शिकवणींचा पर्दाफाश करतो, तेथे खरे आणि वास्तविक शिक्षण देखील प्रदान करतो.

अपेक्षित मसीह (अ.स.) म्हणतात की काही अज्ञानी लोक म्हणतात की आम्ही पवित्र कुरआन समजू शकत नाही, म्हणून आम्ही त्याकडे लक्ष देऊ नये कारण ते खूप कठीण आहे. ही त्यांची चूक आहे. हजरत म्हणाले की पवित्र कुरआनने विश्वासाचे मुद्दे इतक्या वक्तृत्वाने स्पष्ट केले आहेत की ते अतुलनीय आणि अद्वितीय आहे आणि त्यातील युक्तिवादांचा अंतःकरणावर प्रभाव पडतो. कुरआन इतके स्पष्ट आणि वक्तृत्वपूर्ण आहे की अरबस्तानातील बद्दू, जे पूर्णपणे निरक्षर होते ते समजू शकत होते; मग तुम्हाला कसे काय कळणार नाही? सरळ, सोपा आणि साधा तर्क पवित्र कुरआनात आहे. हा एक सरळ मार्ग आहे जो सर्वशक्तिमान अल्लाहने आम्हाला प्रदान केला आहे. एखाद्या व्यक्तीने पवित्र कुरआन काळजीपूर्वक वाचले पाहिजे. जर त्याने त्याच्या आज्ञा आणि आदेशांचे नियमितपणे पालन केले तर तो त्याच्या अल्लाहची प्रसन्नता प्राप्त करेल.

अपेक्षित मसीह व महदी (अ.स.) म्हणतात की पवित्र कुरआन खराखुरा परमेश्वर सादर करतो. सर्वशक्तिमान अल्लाहचे आभार आहे की पवित्र कुरआनने असा ईश्वर सादर केला नाही निर्गुण आहे आणि अनेक वैशिष्टये त्याच्या ताब्यात नाहीत, जसे की तो आत्म्यांचा मालक नाही किंवा मोक्ष देण्याचा अधिकार त्याला प्राप्त नाही की आणि तो कोणाचा पश्चात्ताप स्वीकारू शकत नाही, परंतु पवित्र कुरआननुसार, आम्ही या परमेश्वराचे देवाचे सेवक आहोत जो आमचा निर्माता, मालक, पालनकर्ता, दयाळू, कृपाळू आहे. निवाड्याच्या दिवसाचा अधिपति आहे. श्रद्धावंतासाठी हे कृतज्ञतेचे स्थान आहे की त्यांनी आम्हाला असे पुस्तक दिले आहे जे त्यांचे खरे गुणधर्म दर्शवते. हा सर्वशक्तिमान ईश्वराचा मोठा आशीर्वाद आहे.

हजरत अनवर म्हणाले की, अपेक्षित मसीहाचे ज्ञान आणि विवेक तसेच पवित्र कुरआनचे गुण आणि दर्जा, ईन्शाल्लाह पुढेही मांडण्यात येईल. अल्लाह आम्हाला या गोष्टींना समजून अंमल करण्याचे सामर्थ्य देवो. आमीन.

हुजूर अनवर यांनी अलीकडच्या काही दिवसांत बांगलादेशच्या वार्षिक सम्मलेनात अतिरेकी आणि दहशतवाद्यांच्या हल्ल्याचा उल्लेख केला आणि सांगितले की, पोलिस आणि प्रशासनाच्या आश्वासनानंतर या सम्मेलनाचे आयोजन करण्यात आले, मात्र अतिरेकींनी हल्ला केला तेव्हा पोलिस प्रेक्षक बनून उभे होते आणि नंतर वरून आदेश आल्याने त्यांनी कारवाई केली, पण तोपर्यंत अत्याचार आणि क्रूरता शिगेला पोहोचली होती. नंतर हजरत अनवर यांनी या हल्ल्यात शहीद झालेल्या मा. जाहिद हुसैन साहब यांच्या हौतात्म्याचा उल्लेख केला आणि अल्लाह अतिरेकींना सख्त शिक्षा देवो आणि आम्हांसर्वांवर दया करो असे सांगितले.

प्रार्थनाकडे लक्ष वेधताना हुजूर अनवर यांनी जमातच्या सदस्यांना सांगितले की, या दिवसांत प्रार्थनांवर पहिल्यापेक्षा अधिक भर द्या.

नंतर हुजूर अनवर यांनी अल्जेरियाचे कमाल बदाह साहिब, कॅनडाचे डॉ. शमीम अहमद मलिक साहिबा, जर्मनीचे फरहाद अहमद अमिनी साहिब आणि कॅनडाचे चौधरी जावेद अहमद बिस्मल साहिब यांच्या निधनांचा उल्लेख करत त्यांच्या जीवनावर संक्षेप्त दृष्टीक्षेप टाकले. आणि त्यांची नमाज ए जनाजा अदा करण्याची घोषणा केली.

اَلْحَمْدُلِلّٰہِ! اَلْحَمْدُلِلّٰہِ نَحْمَدُہٗ وَنَسْتَعِیْنُہٗ وَنَسْتَغْفِرُہٗ وَنُؤْمِنُ بِہٖ وَنَتَوَکَّلُ عَلَیْہِ وَنَعُوْذُ بِاللّٰہِ مِنْ شُرُوْرِ اَنْفُسِنَا وَمِنْ سَیِّئَاتِ اَعْمَالِنَا مَنْ یَّھْدِہِ اللّٰہُ فَلَا مُضِلَّ لَہٗ وَمَنْ یُّضْلِلْہُ فَلَا ھَادِیَ لَہٗ وَنَشْھَدُ اَنْ لَّا اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ وَنَشْھَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُہٗ وَرَسُوْلُہٗ. عِبَادَ اللّٰہِ رَحِمَکُمُ اللّٰہُ اِنَّ اللّٰہَ یَأْمُرُ بِالْعَدْلِ وَالْاِحْسَانِ وَاِیْتَآءِ ذِی الْقُرْبٰی وَیَنْھٰی عَنِ الْفَحْشَآءِ وَالْمُنْکَرِ وَالْبَغْیِ یَعِظُکُمْ لَعَلَّکُمْ تَذَکَّرُوْنَ اُذْکُرُوا اللّٰہَ یَذْکُرْکُمْ وَادْعُوْہُ یَسْتَجِبْ لَکُمْ وَلَذِکْرُ اللّٰہِ اَکْبَرُ۔